सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन

# नागरिकांची सनद

## आयुक्त मत्स्यव्यवसाय
## महाराष्ट्र राज्य
## मुंबई

### माहिती पुस्तिका

# नागरिकांची सनद

## आयुक्त मत्स्यव्यवसाय

[किंमत : रु. ३०.००]

# महाराष्ट्रातील मत्स्यव्यवसाय

# मत्स्यव्यवसाय विभागातील योजनांची माहिती पुस्तिका

## प्रस्तावना

मासेमारीच्या दृष्टीने आदर्श असा समुद्र किनारा हे निर्सगाने महाराष्ट्राला दिलेले वरदान आहे. महाराष्ट्राला ७२० किलो मीटर लांबीचा समुद्र किनारा लाभला आहे. या किनाऱ्यावर माशांनी समृद्ध असा ७,००० किलो मीटर क्षेत्रफळाचा पट्टा १४,५५५ हेक्टर निमखाऱ्या पाण्याचे उपयुक्त क्षेत्र व लहान मोठी तळी, पाटबंधारे जलाशय स्वरूपात सुमारे ३.१७ लक्ष हेक्टर भूजल विस्तार लाभलेला आहे.

मर्यादित शेत जमिनीमुळे दर हेक्टरी धान्योत्पादनावर येणारी मर्यादा व सतत वाढणारी लोकसंख्या यामुळे सर्वसामान्य जनतेला भरपूर व सकस आहार पुरविणे ही एक आज बिकट समस्या होऊन बसलेली आहे. अशा परिस्थितीत मासळीसारख्या पूरक आणि सकस अन्नाचे उत्पादन वाढविणे फार आवश्यक ठरते. मासळी हे प्रथिनयुक्त उत्कृष्ट अन्न आहे. लोकांच्या आहारामधील प्रथिनांची गरज भागविण्यात मासळीचा वाटा महत्त्वाचा आहे. समुद्र किनाऱ्यावर व अंतर्भागात राहणाऱ्या मच्छिमारांचे चरितार्थाचे प्रमुख साधन मासेमारी हे आहे. मच्छिमार हे आर्थिकदृष्ट्या मागासलेले आहेत.

(१) उपलब्ध जलसंपत्तीमधून अधिकाधिक मत्स्योत्पादन करणे.

(२) मच्छिमार हे समाजातील दुर्बल गटातील असल्याने त्यांची आर्थिक व सामाजिक सुधारणा घडवून आणणे.

(३) मच्छिमारांना शिक्षण व प्रशिक्षण प्रदान करून त्यांच्या कार्यक्षमतेच्या मर्यादा विकसित करणे,

ही मत्स्यव्यवसाय विभागाची तीन प्रमुख उद्दीष्टे आहेत.

सदर उद्दीष्ट समोर ठेऊन मत्स्यव्यवसाय विकासाच्या दृष्टीने विविध योजनांची अंमलबजावणी करण्यात येत आहे.

मच्छिमार मत्स्यकास्तकार व मत्स्यव्यवसायात इच्छुक या सर्वांना मत्स्यव्यवसायाच्या विविध योजनांची माहिती देऊन त्या योजनेचा फायदा पुरेपूर घ्यावा, या हेतूने ही पुस्तिका प्रसिद्ध करण्यात येत आहे.

मत्स्यव्यवसाय विभागाचे प्रत्येक जिल्ह्यात मत्स्यव्यवसाय कार्यालय असून पुस्तिकेतील योजनाबाबत अधिक माहिती जिल्हा कार्यालयाकडून प्राप्त करता येईल. जेणेकरून योजना योग्यरित्या कार्यान्वित करण्यास मदत होईल.

एच २५३९—१अ

# मनोगत

मत्स्यव्यवसायाचे खरे लाभार्थी आर्थिक, शैक्षणिक आणि सामाजिकदृष्ट्या मागासलेला परंपरागत मच्छिमार आहे.

शैक्षणिक स्तर उंचावल्यामुळे योजनांची माहिती करून घेण्याची व त्यापासून लाभ मिळविण्याची प्रवृत्ती वाढली आहे.

ग्रामीण भागात मत्स्यव्यवसायाच्या माध्यमातून रोजगाराची संधी मोठ्या प्रमाणात उपलब्ध होते.

" नागरिकांची सनद " या पुस्तिकेत मत्स्यव्यवसाय विभागाच्या निरनिराळया योजना व आर्थिक अनुदानाच्या सवलतींची माहिती देण्यात आली आहे.

या पुस्तिकेमुळे सामान्य मच्छिमार तसेच मच्छिमार सहकारी संस्था, मत्स्यव्यवसाय विभागाच्या योजनेचे लाभ सहजतेने घेऊ शकतील अशी मला आशा आहे.

**उपमन्यू चटर्जी,**

आयुक्त मत्स्यव्यवसाय,

महाराष्ट्र राज्य, मुंबई.

१. **योजनेच नाव.**— मच्छिमारांसाठी राष्ट्रीय कल्याण निधी अंतर्गत घरकूल/कूपनलिका बांधून देणे (घरकूल योजना)

**(१) पात्रता :**

(अ) दारिद्र्यरेषेखालील आणि भूमिहिन मच्छिमार यांना प्राध्यान्य.

(ब) किमान १० लाभार्थीचा गट आवश्यक.

(क) घरकुलाकरिता जागा उपलब्ध असणे आवश्यक.

(ड) लाभार्थी क्रियाशील मच्छिमार असावा.

**(२) आर्थिक निकष :**

(अ) प्रति घरकुलांस रु. ४०,००० मर्यादेपर्यंत अर्थसहाय्य अनुज्ञेय.

(ब) १० ते २० घरकुलांसाठी १ कूपनलीका रु. ३०,००० मर्यादेपर्यंत अर्थसहाय्य अनुज्ञेय.

(क) ७५ पेक्षा जास्त घरकूल समूहासाठी एक समाज मंदिर रु. १,७५,००० मर्यादेपर्यंत अर्थसहाय्य.

(ड) लाभार्थीने इतर घरकूल योजनेचा फायदा यापूर्वी घेतलेला नसावा.

**(३) आवश्यक कागदपत्रे :**

अर्जासोबत खालील कागदपत्रे आवश्यक :—

(अ) संबंधित मच्छिमार दारिद्र्य रेषेखालील किंवा भूमिहीन असल्याबाबत ग्रामीण विकास यंत्रणा/तहसीलदार यांचा दाखला.

(ब) जमीन शासकीय/निमशासकीय/मालकीची असल्यास ती या योजनेखाली देण्यास तयार असल्याचे संबंधीत तहसीलदार/ग्रामपंचायत यांचे ना हरकत प्रमाणपत्र व संबंधीत जमिनीच्या ७/१२ उताऱ्याची प्रत.

(क) संबंधित मच्छिमार संस्थेचे क्रियाशील सभासद असल्याचा दाखला.

(ड) घरकूल/कूपनलिका/समाजमंदीर बांधकामाबाबतचे जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा अथवा सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत तयार केलेले नकाशे व अंदाजपत्रक.

(इ) संबंधित बांधकामाची कागदपत्रे या योजनेखाली ठरवून दिलेल्या अर्थसहाय्याचे दरापेक्षा जास्त खर्चाची असली तर उर्वरित रक्कम मच्छिमार सहकारी संस्था लाभार्थी भरण्यास तयार असल्याबाबतचे हमीपत्र.

**(४) प्रकरण कोणाकडे दाखल करावयाचे :**

संस्थेने प्रकरण संबंधित जिल्ह्याच्या जिल्हा मत्स्यव्यवसाय कार्यालयाकडे सादर करावे. सदर योजनेअंतर्गत घरकूल, कूपनलिका व समाजमंदीर बांधकामाचे प्रस्ताव विभागाकडून राज्यशासनामार्फत केंद्र शासनाकडे प्रशासकीय मान्यतेसाठी पाठविले जातात. सदर मान्यता मिळाल्यानंतर राज्य शासन आर्थिक खर्चास मंजूरी देते. नियमानुसार सर्व कादगपत्रांच्या पूर्ततेसह परीपूर्ण प्रस्ताव आर्थिक तरतूद विचारात घेऊन मंजूरी दिली जाते.

**(५) इतर बाबी :**

(अ) घरकुलांचे बांधकाम ३५ चौ. मीटर क्षेत्रफळाचे असेल.

२. **योजनेच नाव.—** मच्छिमार युवकांना प्रशिक्षण

**(१) पात्रता :** मच्छिमार साक्षर असावा मच्छिमार सहकारी संस्थेचा सभासद असावा.

**(२) आर्थिक निकष :** गोड्यापाण्यातील मच्छिमारांसाठी १ महिन्यांचे प्रशिक्षण कालात रु. ३०० विद्यावेतन संबंधित लाभार्थीस अनुज्ञेय.

**(३) आवश्यक कागदपत्रे :** उमेदवारांची मच्छिमार सहकारी संस्थेमार्फत शिफारस.

**(४) प्रकरण कोणाकडे दाखल करावयाचे :** संबंधित जिल्हा मत्स्यव्यवसाय कार्यालयाकडे प्रशिक्षणासाठी अर्ज करावा.

**(५) इतर बाबी :** (अ) प्रशिक्षण यशस्वीरित्या पूर्ण झाल्यानंतर प्रशस्तिपत्र प्रदान करण्यात येते.

(ब) प्रशिक्षण जिल्ह्यातील संबंधित मत्स्यबीज उत्पादन केंद्र/संगोपन केंद्रावर देण्यात येते. प्रशिक्षणार्थींनी राहण्याची व जेवणाची सोय स्वतः करावी.

३. **योजनेच नाव.—** मासेमारी नौकांचे यांत्रिकीकरण.

**(१) पात्रता :**

(अ) या योजनेचा यापूर्वी लाभ घेतलेला नसावा.

(ब) अर्जदार संस्थेचा सभासद व क्रियाशील मच्छिमार असल्याचे संस्थेचे प्रमाणपत्र असावे.

(क) गटातील कमीत कमी एका सदस्याने मत्स्यव्यवसाय प्रशिक्षण केंद्रामध्ये प्रशिक्षण घेतल्याबाबतचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक.

(ड) लाभार्थी १८ ते ५० या वयोमर्यादेतील असावा.

**(२) आर्थिक निकष :**

खालील पद्धतीने गट/संस्थांना राज्य शासन व राष्ट्रीय सहकार विकास निगम कडून अर्थसहाय्य देण्यात येते :—

| अ. क्र. | बाब | अनुदान | खा.वि.भा.भा. | भाग भांडवल | कर्ज | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|
| | मासेमारी यांत्रिक नौका | | | | | |
| १ | राज्य हिस्सा | | १० टक्के | .. | .. | १० टक्के |
| २ | रा. स. वि. नि. | | २० टक्के | ५ टक्के | ५५ टक्के | ८० टक्के |
| | | एकूण | ३० टक्के | ५ टक्के | ५५ टक्के | ९० टक्के |

(संबंधित लाभार्थी मच्छिमार गटाने उभारावयाची रक्कम १० टक्के)

**(३) आवश्यक कागदपत्रे :**

(अ) गटातील सर्व लाभार्थी सदस्य क्रियाशील सभासद असल्याचे संस्थेचे प्रमाणपत्र.

(ब) गेल्या ३ सहकार वर्षातील आर्थिक पत्रके (त्यापैकी किमान १ वर्षाचे लेखा परिक्षण).

(क) संस्थेचा आर्थिक व्यवहार समाधानकारक व संस्थेची कर्ज उभारण्याची पुरेशी क्षमता असावी.

(ड) संस्थेच्या पूर्वीच्या गटांची गेल्या वर्षाची नौका चालवणुकीची विहीत प्रपत्रात माहिती.

(इ) प्रकल्पाची मूल्य दर्शविणारी कागदपत्रे.

(फ) प्रकल्पाचा आयव्यय तक्ता.

(ह) पूर्वीच्या गटाचा यंत्रचलीत नौका ह्या अनधिकृत कामासाठी वापर झालेला नसणे अथवा विक्री झाली नसल्याबाबतचे प्रमाणपत्र.

(ज) संस्था/गटास रु. २० चे स्टॅम्प पेपरवर प्रतिज्ञापत्र.

(न) असे अर्ज रा. स. वि. नि. कडे पाठविल्यानंतर व त्याची मंजुरी प्राप्त होवून लाभधारकास विभागाचे निष्कर्ष व नियमानुसार उपलब्ध तरतुदीच्या अधीन राहून वितरण केले जाते.

**(४) प्रकरण कोणाकडे दाखल करावे :**

संबंधीत सहाय्यक मत्स्यव्यवसाय संचालक (मुंबई/ठाणे/रायगड/रत्नागिरी व सिंधुदुर्ग)

**(५)** (अ) लाभार्थी गटाची अर्थसहाय्यातून उभारलेली नौका त्यावरील कर्जाची व्याजासह परतफेड होईपर्यंत (ती नौका) शासनाकडे तारण राहील.

(ब) शासनाकडून वेळोवेळी निर्गमित झालेल्या योजनेकरिताच्या नियमावलीतील नियमांचे पालन करणे गटावर बंधनकारक राहील.

४. **योजनेच नाव.—** बिगर यांत्रिकी नौकांसाठी बाह्य/आंतर इंजिन खरेदीवर अर्थसहाय्य.

**(१) पात्रता :**

(अ) अर्जदार ग्रमीण भागातील असल्यास दारिद्रय रेषेखालील असावा आणि शहरी भागातील असल्यास कमी उत्पन्न गटाचा असावा.

(ब) आंतर/बाह्य इंजिन बसविण्यासाठी अर्जदाराकडे बिगर यांत्रिकी नौका असावी.

(क) अर्जदार १८ ते ५० वयोमर्यादेतील असावा.

(ड) अर्जदार संस्थेचा सभासद व क्रियाशील मच्छिमार असल्याचे संस्थेचे प्रणाणपत्र असावे.

(इ) मत्स्यव्यवसाय विभागाकडून यांत्रिक नौकेसाठी कोणत्याही प्रकारचा अनुदानाचा लाभ अर्जदाराने घेतलेला नसावा.

**(२) आर्थिक निकष :**

(अ) बाह्य इंजिन : इंजिनाच्या किंमतीच्या ५० टक्के परंतू रु. १०,००० पर्यंत अनुदान.

(ब) आंतर इंजिन : आंतर इंजिनाच्या किंमतीच्या ५ टक्के रु. १२,००० च्या मर्यादेपर्यंत अनुदान.

**(३) आवश्यक कागदपत्रे :** वित्तीय संस्थेकडून अर्थसहाय्य मंजूर झाल्याबाबतचा मंजुरी आदेश व विहीत नमुन्यातील अर्ज.

**(४) प्रकरण कोणाकडे दाखल करावे :** संबंधित सहाय्यक मत्स्यव्यवसाय संचालक/जिल्हा मत्स्यव्यवसाय विकास अधिकारी.

क्यडी २२६९—३ (३००—३-२००८)

५. **योजनेच नाव.—** वीज दरात सवलत

**(१) पात्रता :** मच्छिमार सहकारी संस्था.

**(२) आर्थिक निकष :** वापरलेल्या वीजेवर प्रति युनिट ४० पैसे प्रमाणे अर्थसहाय्य.

**(३) आवश्यक कागदपत्रे :**

(अ) बर्फ कारखाने व शीतगृह चालविणाऱ्या संस्थेचे मागणीपत्र.

(ब) विजेचे देयक (बी. एस. इ. एस.), (एम. एस. इ. बी.).

(क) शासनाची मंजुरी मिळाल्यानंतर (अंदाजीत एक वर्ष) व उपलब्ध निधीच्या अधीन राहून.

**(४) प्रकरण कोणाकडे दाखल करावे :** सहांय्यक मत्स्यव्यवसाय चालक (ठाणे, मुंबई, रायगड, रत्नागिरी व सिंधुदुर्ग)

६. **योजनेच नाव.—**मासळीचे सुरक्षण परिवहन व पणन.

**(१) पात्रता :**

(अ) सहकारी संस्थेने पहिल्या वर्षात त्यांचे भागभांडवल १० टक्क्यांनी वाढविले पाहिजे (बर्फ कारखाना व शीतगृह).

(ब) प्रकल्प राबविण्यास संस्था सक्षम असली पाहिजे.

(क) मच्छिमार सहकारी संस्थेने जिल्हा मच्छिमार संघाशी सामील असले पाहिजे.

**(२) आर्थिक निकष :**

**बर्फ कारखाना व शीतगृह**

५५ टक्के कर्ज

५ टक्के भागभांडवल

३० टक्के खास विमोचक भागभांडवल.

१० टक्के रक्कम लाभार्थीस उभारवयाची आहे.

**ट्रक/टेम्पो/डिझेल टँकर/गोदामे बांधणे**

५० टक्के कर्ज

१५ टक्के भागभांडवल

२५ टक्के अनुदान

१० टक्के रक्कम लाभार्थीस उभारवयाची आहे.

**(३) आवश्यक कागदपत्रे :**

(अ) सहकार विभागाचे मान्यतापत्र.

(ब) प्रकल्प किंमतीच्या १० टक्के रक्कम गुंतवणुकीचे संस्थेचे हमीपत्र.

(क) प्रकल्पाची दर्शविणारी कागदपत्रे/आराखडा.

**(४) प्रकरण कोणाकडे दाखल करावे :** सहाय्यक मत्स्यव्यवसाय संचालक (ठाणे, मुंबई, रायगड, रत्नागिरी व सिंधुदुर्ग)

**(५)** (अ) लाभार्थी मच्छिमार संस्थेने अर्थसहाय्यातून उभारणी केलेल्या बर्फ कारखाना, शीतगृह, गोदाम यंत्रसामुग्रीसह तसेच खरेदी केलेले ट्रक, टेम्पो, डिझेल टॅकर त्यावरील शासन कर्जाचे व्याजासह परतफेड होईपर्यंत शासनाकडे तारण राहील.

(ब) योजनेसाठी शासनाकडून मंजूर झालेल्या नियमावलीतील नियमांचे पालन करणे संस्थेवर बंधनकारक राहील.

**७. योजनेच नाव.**—मत्स्यव्यवसाय सहकारी संस्थांचा विकास.

भूजल व सागरी जिल्ह्यासाठी.

**(१) पात्रता :** महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० व नियम १९६१ अंतर्गत पंजिबद्ध झालेल्या मत्स्यव्यवसाय सहकारी संस्था.

**(२) आर्थिक निकष :** सभासदाच्या वसुली भाग भाडवलाच्या ३ पट किमान मर्यादा.

व्यवस्थापकीय अनुदान

**सागरी :**

(अ) समूह पुरस्कृत प्राथमिक मच्छिमार सहकारी संस्था—उतरत्या क्रमाने ५ वर्षांसाठी,

| | |
|---|---|
| रु. ५०० | पहिले वर्ष |
| रु. ५०० | दुसरे वर्ष |
| रु. ५०० | तिसरे वर्ष |
| रु. २५० | चौथे वर्ष |
| रु. २५० | पाचवे वर्ष |

(ब) समूह पुरस्कृत नसलेल्या प्रार्थमिक मत्स्यव्यवसाय सहकारी संस्था (उतरत्या क्रमाने ५ वर्षांसाठी).

(क) भूजल क्षेत्रातील प्राथमिक मच्छिमार सहकारी संस्था.

(ड) भागभांवल : सहकारी संस्थांना स्वतःच्या भागभांडवलाच्या तिप्पट इतके परंतु जास्तीत जास्त रु. १०,०००.

(इ) जिल्हा संघ व विभागीय संघ- व्यवस्थापकीय अनुदान रु. २५,०००.

**(३) आवश्यक कागदपत्रे :**

(अ) विहित नमुना.

(ब) कार्यकारी संस्थांचा ठराव.

(क) कार्यकारी मंडळाची यादी.

(ड) योजना.

(इ) तीन वर्षाची आर्थिक पत्रके.

(फ) निबंधकाचा तपासणी अहवाल.

(ह) लेखा परिक्षकांचा अहवाल.

(ज) निबंधकाचे अभिप्राय व शिफारस.

**(४) प्रकरण कोणाकडे दाखल करावयाचे :** संबंधित जिल्ह्यांच्या सहाय्यक निबंधक सहकारी संस्था (पदुम) यांचेकडे दाखल करावे.

८. **योजनेच नाव.—**मासेमारी साधनांच्या खरेदीवर अर्थसहाय्य.

**(१) पात्रता :** मच्छिमार संस्थेचा क्रियाशील सभासद असणे आवश्यक.

**(२) आर्थिक निकष :**

नायलॉन सूत/जाळी मोनोफिलामेंट सूत/जाळी व शेव सूत.

**भूजल :**

(अ) प्रत्येक मच्छिमारास ५ किलो मर्यादित सूत/जाळी.

(ब) सुताच्या किंमतीच्या ५० टक्के.

(क) होडी /नौका बांधकामास प्रत्येक मच्छिमारास नौकेच्या ५० टक्के वा रु. ३,००० मर्यादेपर्यंत अनुदान.

(ड) परीपूर्ण अर्ज प्राप्त झाल्यानंतर संबंधित आर्थिक वर्षात उपलब्ध निधीचे मर्यादेत लाभ मिळतो.

**सागरी :**

(अ) नायलॉन सूत/तयार जाळी/मोनो फिलामेंट सूत जाळी—

सुताच्या किंमतीच्या १० टक्के (३ मे. टनावरील प्रत्येक बोटीस प्रतीवर्षी १०० किलो व ३ टनाखालील प्रत्येक बोटीस प्रतीवर्षी ५० किलो मर्यादेपर्यंत.)

(ब) रापणकाराच्या रापणीच्या सुतावर अनुदान—

नायलॉन सूत/जाळी/मोनो फिलॅमेंट सिंथेटिक सूत जाळी सुताच्या किंमतीच्या १५ टक्के (प्रत्येक सभासदास प्रतीवर्षी ३० किलो मर्यादेपर्यंत.)

(क) बिगर यांत्रिकी नौका—

(१) सागरी जिल्ह्यात प्रकल्प किंमतीच्या ५० टक्के परंतु रु. ६०,००० च्या मर्यादेपर्यंत जे कमी असेल ते १० टनापर्यंतची नवीन नौका बांधणेसाठी (लाकडी किंवा फायबर ग्लास) किंवा तयार नौका खरेदीसाठी.

(२) भूजल जिल्ह्यात जलाशयातील मासेमारी साठी लहान नौका (पत्र्याची किंवा लाकडाची) बांधण्यासाठी किंवा तयार नौका खरेदीसाठी रु. ३,००० चे मर्यादेत अनुदान.

(३) पात्रता : अर्जदाराने यापूर्वी यांत्रिक/बिगर यांत्रिक नौकासाठी अनुदानाचा लाभ घेतला नसावा.

(४) अर्जदार विभागाचा कर्ज थकबाकीदार नसावा.

(५) अर्जदाराचे वार्षिक उत्पन्न एकात्मिक ग्रामीण विकास योजनेअंतर्गत अनुदान मिळण्यास पात्र उत्पन्न मर्यादेत असावे.

(६) अर्जदारास बँकेकडून किंवा इतर वित्तीय संस्थेकडून प्रकल्प किंमती इतके कर्ज मंजूर केले असावे किंवा प्रकल्प किंमतीइतके अर्थसहाय्य उभारण्याची अर्जदाराची क्षमता असावी.

(७) बँकेकडून घेतलेल्या कर्जाची नियमित परतफेड केल्यास व बँकेने तसे प्रमाणित केल्यास बँकेचा समान व्याजाचा दर व दरसाल दर शेकडा रु. ४ प्रमाणे व्याज दर व मधील फरक ऐवढे व्याज अनुदान शासनाकडून मिळेल.

**(३) आवश्यक कागदपत्रे :**

**भूजल :**

(अ) संस्थेने सुरूवातीला सभासदांकडून ५० टक्के रक्कम वसूल करून जिल्हा संघ/शिखर संघ त्यांचेकडे भरणा करावी. संघ /शिखर संघाने संस्थेच्या मागणीनुसार पुरवठा केलेल्या जाळ्याची उर्वरित ५० टक्के रक्कम अदा करणेसाठी संबंधित जिल्हा कार्यालयाकडे मागणी केल्यानंतर जिल्हा कार्यालय पुरवठा केलेल्या जाळ्याची खात्री करून घेऊन अनुदानाची रक्कम संघ/शिखर संघ यांचेकडे पाठविण्याची कार्यवाही करील.

(ब) सभासदांनी बांधलेल्या नौकेची जिल्हा कार्यालयांने पहाणी केल्यानंतर सदर बोटीची निर्धारित किंमत ठरवितात व प्रकल्प किंमतीच्या ५० टक्के रक्कम अदा करतात.

(क) परिपूर्ण अर्ज प्राप्त झाल्यानंतर संबंधित आर्थिक वर्षात उपलब्ध निधीचे मर्यादेत लाभ मिळते.

**सागरी :**

वरीलप्रमाणे कार्यपद्धती अंमलात आणली जाते विशेष केंद्रीय सहाय्य अंतर्गत रायगड, ठाणे, यवतमाळ व गडचिरोली जिल्ह्यातील आदिम जमातीतील मच्छिमारी करणाऱ्यांना त्यांच्या मागणीनुसार रु. २,००० पर्यंत मर्यादित १०० टक्के अनुदानावर जाळ्याचा पुरवठा करण्यात येतो.

लाभार्थी हे आदिवासी विभागाने प्रमाणित केलेले असावे.

**(४) प्रकरण कोणाकडे दाखल करावे :** संबंधित जिल्हा कार्यालयाकडे प्रकरण दाखल करावे.

९. **योजनेचे नाव.**— मासेमारी संकट निवारण निधी अंतर्गत मच्छिमारांना अर्थसहाय्य.

**(१) पात्रता :**

(अ) मृत मच्छिमार संस्थेचे क्रियाशील सभासद असणे आवश्यक.

(ब) मच्छिमार समुद्रात/खाडीत किंवा जलाशय/तलावात प्रत्यक्ष मासेमारी करीत असतांना मृत/बेपत्ता झाल्यास त्यांच्या कायदेशीर वारसाने अर्ज करणे आवश्यक आहे.

**(२) आर्थिक निकष :** वारसास ५०,००० इतके आर्थिक सहाय्य शासनाकडून देण्यात येते.

**(३) आवश्यक कागदपत्रे :**

(अ) मृत/बेपत्ता व्यक्तींची नोंद पोलीस स्टेशन मध्ये केलेली असावी.

(ब) मृत मच्छिमार क्रियाशील मच्छिमार असल्याबद्दल मत्स्यव्यवसाय सहकारी संस्थेचा दाखला.

(क) सदर मृत व्यक्तीचे नाव जन्म/मृत्यू नोंद रजिस्टर मध्ये असावे.

(ड) मृत मच्छिमाराचे ग्रामपंचायतीने दिलेले वारस प्रमाणपत्र.

(इ) पोलीस पंचनामा.

(फ) वारसदारांकडून परिपूर्ण अर्ज प्राप्त झाल्यासपासून साधारण ६० दिवसांत वारसदाराला रक्कम मिळण्याची व्यवस्था केली जाते.

**(४) प्रकरण कोणाकडे दाखल करावे :** संबंधित जिल्ह्याचे जिल्हा मत्स्यव्यवसाय विकास अधिकारी/संबंधित सहाय्यक मत्स्यव्यवसाय संचालक.

**१०. योजनेच नाव.—**पश्चिमघाट विकास योजना सायकल/शितपेटी करिता अर्थसहाय्य

**(१) पात्रता :**

(अ) लाभार्थी मच्छिमार संस्थेचा क्रियाशील सभासद.

(ब) संस्था पश्चिम घाट तालुक्यातील योजनेअंतर्गत त्या तालुक्यातील कार्यरत संस्था असावी.

(क) दारिद्र्य रेषेखालील व अनुसूचित जाती जमातीतील लाभार्थ्यांना प्राधान्य.

**(२) आर्थिक निकष :**

१०० टक्के केंद्रशासनाचे अर्थ सहाय्य अनुदान स्वरुपात.

**(३) आवश्यक कागदपत्रे :**

(अ) संस्थेचा ठराव.

(ब) संस्थेची शिफारस.

**(४) प्रकरण कोणाकडे दाखल करावे :**

संबंधित जिल्हा मत्स्यव्यवसाय विकास अधिकारी.

**११. योजनेचे नाव.—**निमखारेपाणी मत्स्यसंवर्धक विकास यंत्रणा

**(१) पात्रता :**

(अ) अनुदान मागणीसाठी विहित नमुन्यातील अर्ज.

(ब) बांधकाम पूर्ण झाल्यानंतर प्रकल्पाचे मूल्यनिर्धारण अहवाल आवश्यक.

(क) खत खाद्य इत्यादीच्या पावत्या देणे आवश्यक.

(ड) केंद्रीय जलकृषि प्राधिकरणाची परवानगी आवश्यक.

(ई) प्रशिक्षण : प्रशिक्षणासाठी अर्ज करणे आवश्यक.

**(२) आर्थिक निकष :**

(अ) तळी बांधकाम व पहिल्या पिकावर अनुदान देण्यासाठी एकूण जलक्षेत्राच्या नोंदी करिता मूल्यनिर्धारण अहवाल आवश्यक.

(ब) प्रकल्प खर्चाच्या २५ टक्के परंतु प्रती हेक्टरी रुपये ३०,००० च्या मर्यादेत (जास्तीत जास्त १० हेक्टरसाठी अनुदान देय.)

**(३) आवश्यक कागदपत्रे :**

(अ) अनुदान मागणी अर्ज

(ब) प्रकल्पाचा मूल्य निर्धारण अहवाल.

(क) खर्चाच्या पावत्या.

(ड) जलकृषी प्राधिकरणाची परवानगी.

(ई) ७/१२ उतारा, नकाशा प्रकल्प अहवालाची प्रत.

(फ) जागा विकत अथवा भाड्याने घेतली असल्याचा करारपत्र.

**(४) प्रकरण कोणाकडे दाखल करावे :**

परिपूर्ण प्रकरण सागरी जिल्ह्यातील मुख्य कार्यकारी अधिकारी, निमखारे पाणी मत्स्यसंवर्धक विकास यंत्रणाकडे.

**१२. योजनेचे नाव.**—मच्छिमारांना डिझेलवरील सवलत.

**(१) पात्रता :**

(अ) लाभार्थी मच्छिमार सहकारी संस्थेचा सभासद असावा.

(ब) मासेमारी नौकांच्या गट प्रमुखांनी/मालकांनी/या विभागाकडून मान्यताप्राप्त असलेल्या डिझेल विक्री केंद्राकडूनच नौकेसाठी डिझेल तेल विकत घेतले पाहिजे.

(क) संबंधित मान्यताप्राप्त मच्छिमार सहकारी संस्थेने त्यांच्या विक्री केंद्रावरील डिझेल तेलाचा मंजुर कोटा, प्रत्यक्ष उचल व विक्री या बाबतची दैनिक आकडेवारी विहित नमुना-३ मधील नोंदवहीत ठेवली पाहिजे. केंद्र शासनाने अनुदानाची रक्कम मंजुर केल्यानंतर (१ वर्ष) व राज्य शासनाची मंजुरी मिळाल्यानंतर उपलब्ध निधीच्या अधीन राहून.

**(२) आर्थिक निकष :**

या योजनेखाली मच्छिमारांनी मासेमारीसाठी खरेदी केलेल्या डिझेलवर प्रतीलीटर रु. १.५० प्रमाणे सवलत देण्यात येते.

**(३) आवश्यक कागदपत्रे :**

(अ) विधीग्राह्य मासेमारी परवाना क्रमांक व मुदत

(ब) वापरेल्या डिझेलच्या पावत्या.

(क) संस्थेची शिफारस व प्रमाणपत्र

(ड) प्रपत्र अ,ब,क व ड इत्यादी प्रमाणे

**(४) प्रकरण कोणाकडे दाखल करावे :**

सहाय्यक मत्स्यव्यवसाय संचालक (ठाणे, मुंबई, रायगड, रत्नागिरी व सिंधुदुर्ग)

**१३. योजनेचे नाव.**—मत्स्यसंवर्धक विकास यंत्रणा.

(१) २० हेक्टर जलक्षेत्राच्या आतील तलावांची निवड करणे.

(२) जलक्षेत्राच्या प्रमाणात मत्स्यबोटूकली साठवणूक करणे.

(३) पूर्वी परंपरागत पद्धतीने मत्स्यशेती केली जात होती ती आता आधुनिक तांत्रिक पद्धतीने मत्स्यशेती करून उत्पादनात वाढ करणे.

(४) या योजनेत २५ टक्के अनुदान देण्यात येत असून त्या मध्ये २५ टक्के राज्य व ७५ टक्के केंद्र हिस्सा आहे.

(५) मच्छिमारांना शिक्षण व प्रशिक्षण प्रदान करून त्यांच्या कार्यक्षमतेची मर्यादा वाढविणे.

(६) प्रशिक्षणासाठी प्रशिक्षण १० दिवसांचे प्रति दिन रु. १०० विद्यावेतन व अधिक रु. १०० प्रवास खर्च.

(७) १ हेक्टर जलक्षेत्रातून पारंपरिक पद्धतीने ४०० किलो / हेक्टर उत्पादन हे प्रति हेक्टर जलक्षेत्रात १५० किलो पर्यंत मिळविणे.

(८) यासाठी जिल्ह्याच्या जिल्हा मत्स्यव्यवसाय विकास अधिकारी /मुख्य कार्यकारी अधिकारी मत्स्यसंवर्धक विकास यंत्रणा यांचे कडे अर्ज करावा.

(९) लाभधारक — मत्स्यव्यवसाय सहकारी संस्था / खाजगी कास्तकार यांना या योजनेचा लाभ घेता येईल.

**१४. योजनेचे नाव.**—अवरुद्ध पाण्यात मत्स्यसंवर्धन.

(१) भूजलाशयीन जलक्षेत्र महाराष्ट्र राज्यात ३.१७ लक्ष हेक्टर उपलब्ध आहे.

(२) भूजल क्षेत्रात मत्स्योत्पादन वाढविणे.

(३) प्रमुख भारतीय कार्पस (कटला, मृगळ, रोहू) मासळीचे बोटूकली स्वरूपात बीज व सायप्रिनस मत्स्यबीज साठवणूक करणे.

(४) ग्रामीण भागातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील मत्स्यव्यवसाय सहकारी संस्थांच्या सभासदांना ग्रामीण रोजगार उपलब्ध करून देणे.

(५)मत्स्यकास्तकारांचा शैक्षणिक, सामाजिक व आर्थिक विकास घडवून आणणे.

(६) लाभधारक—बिगर आदिवासी , आदिवासी व अनुसूचित जमातीचे मच्छिमार / मत्स्यकास्तकार सभासदांच्या मत्स्यव्यसाय सहकारी संस्थांना याचा लाभ मिळतो.

# मत्स्यव्यवसाय विभाग

| अ. क्र. (१) | विभागाकडून कार्यालयाकडून पुरविली जाणारी सेवा (२) | आवश्यक कागदपत्रांची पूर्तता केल्यानंतर किती कालावधीत सेवा पुरविली जाईल (३) | सेवा पुरविणारा अधिकारी/कर्मचारी (४) | सेवा विहित कालावधीत पुरविली न गेल्यास ज्यांच्याकडे तक्रार करता येईल तो अधिकारी व त्याचा दूरध्वनी क्रमांक (५) |
|---|---|---|---|---|
| १ | मच्छिमारांसाठी राष्ट्रीय कल्याणनिधी अंतर्गत घरकुल/कूपनलिका बांधून देणे. (घरकुल योजना) | सदरयोजने अंतर्गत घरकुले कूपनलिका व समाज मंदीर बांधण्याबाबतचे प्रस्ताव विभागाकडून राज्य शासनामार्फत केंद्र शासनाकडे प्रशासकीय मान्यतेसाठी पाठविले जातात. सदर मान्यता मिळाल्यानंतर राज्य शासन आर्थिक खर्चास मंजुरी देते नियमानुसार सर्व कागदपत्राच्या पूर्ततेसह परिपूर्ण प्रस्तावास एका आर्थिक वर्षात अशी मंजुरी मिळते. | सहायक मत्स्यव्यवसाय संचालक/जिल्हा मत्स्यव्यवसाय विकास अधिकारी यांचे कार्यालय | आयुक्त, मत्स्यव्यवसाय, महाराष्ट्र राज्य, मुंबई<br>दू. ध्व. ०२०/२२८२१२३९<br>प्रादेशिक मत्स्य. उप संचालक मुंबई २६५५३२७९.<br>पुणे २५६५३४३०,<br>नाशिक २५९९५१४, औरंगाबाद २३३४७५४, अमरावती २६६२८०१,<br>नागपूर २५३०३७४ |
| २ | मच्छिमार युवकांना प्रशिक्षण. | एक महिना कालावधी | सहायक मत्स्यव्यवसाय संचालक/जिल्हा मत्स्यव्यवसाय विकास अधिकारी यांचे कार्यालय | आयुक्त, मत्स्यव्यवसाय, महाराष्ट्र राज्य,<br>दू. ध्व. ०२०/२२८२१२३९<br>प्रादेशिक मत्स्य. उप संचालक मुंबई २६५५३२७९.<br>पुणे २५६५३४३०,<br>नाशिक २५९९५१४, औरंगाबाद २३३४७५४, अमरावती २६६२८०१,<br>नागपूर २५३०३७४ |
| ३ | मासेमारी नौकांचे यांत्रिकीकरण | (१) पुरस्कृत संस्थेमार्फत प्राथमिक स्वरूपात अर्ज जिल्हा कार्यालयाकडे प्राप्त होतात. अशा अर्जाची प्राथम्ययादी जिल्हा कार्यालयाकडे तयार केली जाते.<br>(२) प्रतिवर्षी उपलब्ध झालेल्या तरतुदीनुसार प्राथम्य यादीतील अर्ज विचारात घेतले जातात.<br>(३) असे अर्ज रा.स.वि.नि. कडे पाठविल्यानंतर सहा महिन्याच्या कालावधीत त्यांना मंजुरी प्राप्त होऊन लाभधारंकासह विभागाचे निष्कर्ष व नियमानुसार अर्थसहाय्याचे वितरण केले जाते. | सहाय्यक मत्स्यव्यवसाय संचालक, (मुंबई, ठाणे, रायगड, रत्नागिरी, सिंधुदूर्ग) | आयुक्त, मत्स्यव्यवसाय, महाराष्ट्र राज्य, मुंबई<br>दू. ध्व. ०२०/२२८२१२३९<br>प्रादेशिक मत्स्य. उप संचालक मुंबई २६५५३२७९. |

| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
|---|---|---|---|---|
| ४ | बिगर यांत्रिकी नौकांसाठी बाह्य/आंतर इंजिन खरेदीवर अर्थसहाय्य. | या योजनेचा लाभ राज्यातील सागरी व भूजलाशयीन जिल्ह्यातील वैयक्तिक मच्छिमार/सहकारी संस्था घेण्यास पात्र आहेत. यासाठी अर्जदाराने जिल्हा कार्यालयाकडे अर्ज करणे आवश्यक आहे. अर्जदाराने नौकाचे बील शासनमान्य यादीवरील इंजिन खरेदी केल्याची पावती, कर्ज उभारणीचा तपशील, इंजिन बनावट क्रमांक, किंमत इत्यादी तपशीलासह अर्ज पूर्ण केल्यास उपलब्ध निधीनुसार अर्जदारास एक ते सहा महिन्याचे आत अनुदान प्राप्त होते. | संबंधित जिल्ह्याचे सहायक मत्स्यव्यवसाय संचालक/ जिल्हा मत्स्यव्यवसाय विकास अधिकारी. | आयुक्त, मत्स्यव्यवसाय, महाराष्ट्र राज्य, मुंबई<br>दू. ध्व. ०२०/२२८२१२३९<br>प्रादेशिक मत्स्य. उप संचालक मुंबई २६५५३२७९<br>पुणे २५६५३४३०,<br>नाशिक २५९९५१४, औरंगाबाद २३३४७५४, अमरावती २६६२८०१.<br>नागपूर २५३०३७४. |
| ५ | वीज दरात सवलत | शासनाची मंजुरी मिळाल्यानंतर (अंदाजित एक वर्ष) उपलब्ध निधीच्या अधीन राहून. | सहायक मत्स्यव्यवसाय संचालक,<br>(मुंबई, ठाणे, रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग). | आयुक्त, मत्स्यव्यवसाय, महाराष्ट्र राज्य, मुंबई<br>दू. ध्व. ०२०/२२८२१२३९<br>प्रादेशिक मत्स्य. उप संचालक मुंबई २६५५३२७९. |
| ६ | मासळीचे संरक्षण परिवहन व पणन | परिपूर्ण अर्ज प्राप्त झाल्यानंतर संबंधित आर्थिक वर्षात उपलब्ध निधीच्या मर्यादेत लाभ मिळतो. | सहायक मत्स्यव्यवसाय संचालक,<br>(मुंबई, ठाणे, रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग). | आयुक्त, मत्स्यव्यवसाय, महाराष्ट्र राज्य, मुंबई<br>दू. ध्व. ०२०/२२८२१२३९<br>प्रादेशिक मत्स्य. उप संचालक मुंबई २६५५३२७९. |
| ७ | मत्स्यव्यवसाय सहकारी संस्थांचा विकास | परिपूर्ण अर्ज प्राप्त झाल्यानंतर संबंधित आर्थिक वर्षात उपलब्ध निधीच्या मर्यादेत लाभ मिळतो. | संबंधित जिल्ह्याचे सहायक मत्स्यव्यवसाय संचालक/ जिल्हा मत्स्यव्यवसाय विकास अधिकारी. | आयुक्त, मत्स्यव्यवसाय, महाराष्ट्र राज्य, मुंबई<br>दू. ध्व. ०२०/२२८२१२३९<br>प्रादेशिक मत्स्य. उप संचालक मुंबई २६५५३२७९<br>पुणे २५६५३४३०,<br>नाशिक २५९९५१४, औरंगाबाद २३३४७५४, अमरावती २६६२८०१,<br>नागपूर २५३०३७४. |

| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
|---|---|---|---|---|
| ८ | मासेमारी साधनांचा खरेदीवर अर्थसहाय्य. | परिपूर्ण अर्ज झाल्यानंतर संबंधित आर्थिक वर्षात उपलब्ध निधीच्या मर्यादेत लाभ मिळतो. | संबंधित जिल्ह्याचे सहायक मत्स्यव्यवसाय संचालक/व जिल्हा मत्स्यव्यवसाय विकास अधिकारी. | आयुक्त, मत्सव्यवसाय, महाराष्ट्र राज्य, मुंबई<br>दू. ध्व. ०२०/२२८२१२३९<br>प्रादेशिक मत्स्य. उप संचालक मुंबई २६५५३२७९<br>पुणे २५६५३४३०,<br>नाशिक २५९९५१४, औरंगाबाद २३३४७५४, अमरावती २६६२८०१,<br>नागपूर २५३०३७४. |
| ९ | मासेमारी संकट निवारण निधी अंतर्गत मच्छिमारांना अर्थसहाय्य. | वारसदारांकडून विचारात घेवून मंजूरी दिली जाते. अर्ज प्राप्त झाल्यापासून साधारण ६० दिवसांत वारसदाराला रक्कम मिळण्याची व्यवस्था केली जाते. | संबंधित जिल्ह्याचे सहायक मत्स्यव्यवसाय संचालक/व जिल्हा मत्स्यव्यवसाय विकास अधिकारी. | आयुक्त, मत्सव्यवसाय, महाराष्ट्र राज्य, मुंबई<br>दू. ध्व. ०२०/२२८२१२३९<br>प्रादेशिक मत्स्य. उप संचालक मुंबई २६५५३२७९<br>पुणे २५६५३४३०,<br>नाशिक २५९९५१४, औरंगाबाद २३३४७५४, अमरावती २६६२८०१,<br>नागपूर २५३०३७४. |
| १० | पश्चिमघाट विकास योजना (सायकल/ शीतपेटी करिता अर्थसहाय्य.) | परिपूर्ण प्रस्ताव पूर्ण झाल्यानंतर १ सायकली शीतपेट्या महिने २ मर्यादेत लाभ मिळतो. | संबंधित जिल्ह्याचे सहायक मत्स्यव्यवसाय संचालक/व जिल्हा मत्स्यव्यवसाय विकास अधिकारी. | आयुक्त, मत्सव्यवसाय, महाराष्ट्र राज्य, मुंबई<br>दू. ध्व. ०२०/२२८२१२३९<br>प्रादेशिक मत्स्य. उप संचालक मुंबई २६५५३२७९<br>पुणे २५६५३४३०,<br>नाशिक २५९९५१४, औरंगाबाद २३३४७५४, अमरावती २६६२८०१,<br>नागपूर २५३०३७४. |

| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
|---|---|---|---|---|
| ११ | निमखार पाणी मत्स्य-संवर्धक विकास यंत्रणा. | अर्जदारांकडून आवश्यक कागदपत्रांच्या पूर्ततेनंतर दोन महिन्यात निर्णय घेण्यात येईल. | मुख्य कार्यकारी अधिकारी, निमखारे पाणी मत्स्य-संवर्धक विकास यंत्रणा ठाणे, रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, मुंबई या जिल्ह्यांकरिता कार्यान्वयित. | आयुक्त, मत्स्यव्यवसाय, महाराष्ट्र राज्य, मुंबई<br>दू. ध्व. ०२०/२२८२१२३९<br>प्रादेशिक मत्स्य. उप संचालक, मुंबई २६५५३२७९. |
| १२ | मच्छिमारांना डिझेलवरील सवलत. | केंद्र शासनाने अनुदानाची रक्कम मंजूर केल्यानंतर (१ वर्ष) व राज्य शासनाची मंजुरी मिळाल्यानंतर उपलब्ध निधीच्या अधीन राहून. | सहायक मत्स्यव्यवसाय संचालक<br>ठाणे, रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, मुंबई. | आयुक्त, मत्स्यव्यवसाय, महाराष्ट्र राज्य, मुंबई<br>दू. ध्व. ०२०/२२८२१२३९<br>प्रादेशिक मत्स्य. उप संचालक, मुंबई २६५५३२७९. |
| १३ | मत्स्यसंवर्धक विकास यंत्रणा. | परिपूर्ण प्रस्ताव सादर केल्यानंतर दोन महिने. | संबंधित जिल्ह्यातील मुख्य कार्यकारी अधिकारी, मत्स्यसंवर्धक विकास यंत्रणा. | आयुक्त, मत्स्यव्यवसाय, महाराष्ट्र राज्य, मुंबई<br>दू. ध्व. ०२०/२२८२१२३९<br>प्रादेशिक मत्स्य. उप संचालक, मुंबई २६५५३२७९<br>पुणे २५६५३४३०,<br>नाशिक २५९९५१४, औरंगाबाद २३३४७५४, अमरावती २६६२८०१,<br>नागपूर २५३०३७४. |
| १४ | अवरुद्ध पाण्यात मत्स्यसंवर्धन. | परिपूर्ण प्रस्ताव सादर केल्यानंतर दोन महिने. | संबंधित जिल्ह्यातील जिल्हा मत्स्यव्यवसाय विकास. | आयुक्त, मत्स्यव्यवसाय, महाराष्ट्र राज्य, मुंबई<br>दू. ध्व. ०२०/२२८२१२३९<br>प्रादेशिक मत्स्य. उप संचालक, मुंबई २६५५३२७९<br>पुणे २५६५३४३०,<br>नाशिक २५९९५१४, औरंगाबाद २३३४७५४, अमरावती २६६२८०१,<br>नागपूर २५३०३७४. |